# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.04.2026** **वारः गुरुवार**

1. देशाच्या जनगणनेला सुरुवात, देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा स्वगणना अभियानात सहभाग
2. महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय
3. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रुपे ऑन द गो, एनसीएमसी सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचं लोकार्पण आणि
4. राज्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यांसह गारांचा पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा इशारा

**जनगणना**

देशाच्या जनगणनेला कालपासून सुरुवात झाली. यावेळी प्रथमच स्वगणनेचा पर्याय उपलब्ध असून यासाठी स्वतंत्र पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. देशाच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वगणना अभियानात सहभागी होऊन या पोर्टलवर आपले तपशील नोंदवले. गृहसचिव गोविंद मोहन आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यावेळी उपस्थित होते. राज्यात 1 ते 15 मे या कालावधीत नागरिक या पोर्टलवर स्वतः माहिती भरु शकतील. प्रथम 34 प्रश्नांची माहिती भरून ती सादर केल्यानंतर नागरिकांना एक विशिष्ट ओळख क्रमांक मिळेल. तो जपून ठेवून 16 मे ते 14 जून या कालावधीत घरी येणाऱ्या जनगणना अधिकारी किंवा प्रगणक यांना तो द्यायचा आहे.

**मंत्रीमंडळ निर्णय**

राज्यातील नद्यांचं प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नदी संवर्धन-पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक कामं करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे. काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय मंजूर करण्यात आला. नदी पुनरूज्जीवनाच्या सर्व पैलूंना चालना देणारी प्रमुख संस्था म्हणून तसंच सर्वोच्च निर्णय घेण्याचं काम हे प्राधिकरण करणार आहे.

राज्यातल्या शिशुवर्गापासून बारावीपर्यंतच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. बैठकीत या योजनेसाठी अपेक्षित 23 कोटी 11 लाख रूपयांच्या आवर्ती तरतुदीलाही मान्यता देण्यात आली. भूमि अभिलेख विभागातील क गट संवर्गातील भूकरमापक हे पद रद्द करून परिरक्षण भूमापक असं पद निर्माण करण्याला मंत्रिमंडळानं मंजूरी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी 1 हजार 234 कोटी 13 लाख रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळानं मंजूरी दिली. या योजनेमुळे सिंचनासाठी आणि पिण्यासाठी 1 पूर्णांक 80 टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. अमरावती महापालिकेला क्रीडा संकुलासाठी नवसारी इथली 16 हजार 708 चौरस मीटर जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**लोकार्पण**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीनं विविध सामाजिक घटकांसाठी एसटीचा प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्यात येत आहे. या अनुषंगानं रुपे ऑन द गो, एनसीएमसी सक्षम स्मार्ट कार्ड योजनेचं लोकार्पण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी नागरिक रमेश ढावरे, संगीता पालकर आणि वर्षा कांबळे या

सवलत धारक प्रवाशांना हे कार्ड देण्यात आलं. या उपक्रमाच्या अंतर्गत विविध सवलतधारक प्रवाशांना आधार क्रमांकाशी संलग्न एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरित करण्यात येणार आहे. या कार्डमुळे प्रवाशांना एसटी बस प्रवासातील सवलतींचा लाभ अधिक सुलभतेनं मिळणार असून, प्रवास व्यवस्थापन अधिक डिजिटल आणि पारदर्शक होणार आहे.

**नक्षली आत्मसमर्पण-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात आता केवळ सहा सशस्त्र नक्षलवादी शिल्लक असून, जयराम गावडे हा एकमेव नक्षली गडचिरोली जिल्ह्याचा रहिवासी आहे. अन्य पाच जण छत्तीसगडमधील आहेत. गेल्या मंगळवारी नक्षल निर्मुलनाच्या अंतिम मुदतीच्या दिवशी डाव्या पक्षांचे नेते भाई रामदास जराते यांच्यासोबत काही कार्यकर्त्यांनी जयरामच्या गिलनगुडा इथल्या घरी जाऊन त्यांचे वडील मोंगे गावळे यांच्याशी चर्चा केली. जयरामने बंदुकीचा त्याग करून लोकशाहीचा मार्ग स्वीकारावा, अशी अपेक्षा या नेत्यांनी व्यक्त केली. जयरामच्या वडीलांनीही त्याला चळवळ सोडून घरी परतण्याचं आवाहन केलं आहे.

**नक्षली नसबंदी-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात पोलिसांसमोर शरण आलेल्या 14 नक्षल्यांची नसबंदी खुली करण्याची शस्त्रक्रिया अलिकडेच करण्यात आली. नक्षल चळवळीच्या नियमानुसार नक्षल दलममध्ये भरती होणाऱ्या सदस्यांची नसबंदी करावी लागते. शरण आल्यानंतर त्यांना सांसारिक सुख उपभोगता यावं, यासाठी गडचिरोली पोलिस आणि 'सर्च' फाउंडेशनच्या पुढाकारानं नसबंदी खुली करण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया करणारे मुंबईच्या लीलावती रुग्णालयाच्या पथकातील डॉक्टर श्रीरंग पुरोहित यांनी आकाशवाणीला ही माहिती दिली...

**गडचिरोलीतील सर्च हॉस्पिटल मध्ये काही दिवसांपूर्वी आत्मसमर्पण केलेल्या चौदा नक्षलवाद्यांवर वसेक्टमी रिव्हर्सल ची शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या रुग्णांचा वयोगट तेवीस ते चाळीस असा होता. या सर्व शस्त्रक्रिया यशस्वी झाल्या असून त्यांचं आता पुढील फॉलोअप च सुद्धा नियोजन केलेलं आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना कौटुंबिक जीवन सुरू करता यावे यासाठी जिल्हा पोलिसांच्या संयोजनातून या शस्त्रक्रिया करण्यात आल्या या शस्त्रक्रिया करण्याची विचारणा गडचिरोली येथील पोलिसांनी सर्च हॉस्पिटल कडे केली होती सर्च ही संस्था गेली चाळीस वर्षे गडचिरोलीत आरोग्य सेवा देत आहे या शस्त्रक्रियांच्या माध्यमातून मलाही आरोग्य सेवा देता आली याचा मला आणि माझ्या टीमला अत्यंत आनंद आहे.**

**कोपीवरची शाळा उपक्रम**

पुणे जिल्ह्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या वतीनं ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी 'कोपीवरची शाळा' हा उपक्रम राबवण्यात आला. यंदाच्या हंगामात 486 मुलांची नोंद झाली होती. त्यापैकी 6 ते 14 वयोगटातील 238 मुलांची शैक्षणिक क्षमता तपासण्यात आली. हंगामअखेर झालेल्या चाचणीत 182 मुलांच्या शैक्षणिक स्तरात सुधारणा झाल्याचे दिसून आले. या मुलांच्या शिक्षणाविषयी बोलताना त्यांचे शिक्षक नौशाद बागवान म्हणाले...

**इथे जेव्हा ही मुलं येतात तेव्हा लोकांशी बोलणं कुठून आलात कसं त्यांच्यात मिक्स होणं या गोष्टी आम्ही सुरवातीला करतो त्याच्यानंतर मुलांचा सर्वे केला जातो सर्व्हे आम्ही शून्य ते अठरा वयोगटापर्यंत करत असतो आम्ही वर्गानुसार अभ्यास घेत नाही मुलांचा कारण बरीच मुलं आम्हाला असे आढळतात की जे आठवीच्या वयाचे आहेत पण त्यांना मुळाक्षरंही माहीत नसतात बाराकडीचे शब्दही माहीत नसतात त्यामुळे आम्ही त्यांचे पाच तर करतो पूर्वतयारी पण आता चाळीसगाव जळगाव धुळे या भागातून आदिवासी त्यांनी बंजारा समाजात भरपूर प्रमाणात ऊसतोडणीसाठी यायला लागलेला आहे आणि या मुलांना वर्गापर्यंत आणणं हीच खूप मोठी गोष्ट झालेली आहे कारण ही मुलं बरीच मुलं गावाकडेही शाळेत गेली नाहीत कधीच त्यामुळे या मुलांच्या पालकांशी बोलत राहणं मुलांशी बोलत राहणं आणि ते निदान वर्गापर्यंत येतील आणि त्यांना काही गोष्टी शिकता येतील पण ही मुलं जर इथे फक्त महिना दोन महिने येत असतील आणि जर इथे काही गोष्टी शिकली आणि गावाकडे गेलं तर साईड गेलीच नाहीत तर त्यांचं पुढे ते शिकणारच नाहीत ना..**

**कार्यशाळा**

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे, ग्रामीण भागातील नागरिकांच्या सामुहिक वर्तणुकीत बदल घडवणे आणि आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यावर भर देण्यात येत आहे. त्यामुळे लोकसहभागाच्या माध्यमातून गाव आरोग्य संपन्न करण्यावर भर द्यावा, असं आवाहन सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केलं आहे. या अभियानाच्या विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल पुण्यात बोलत होते. या अभियानात गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आरोग्य संपन्न ग्राम म्हणून मानांकन आणि प्रोत्साहनपर पुरस्कार देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या कार्यशाळेत पुण्यासह विविध जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

**हनुमान जयंती**

राज्यात आज हनुमान जयंती साजरी केली जात आहे. यानिमित्त हनुमान मंदिरांमध्ये हनुमान जन्मसोहळा साजरा करण्यात आला. हनुमान जयंतीनिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून पिंपरी चिंचवडमध्ये सामुहिक सुंदरकांड महापर्वाचं आयोजन करण्यात आलं आहे. शहरातील विविध धार्मिक संस्थांच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमात सुंदर कांडचं पठण आणि52 लाख वेळा रामनामाचा जप करण्यात येणार आहे.

**जोतिबा चैत्रयात्रा- कोल्हापूर**

दख्खनचा राजा श्री जोतिबाच्या चैत्र पौर्णिमा यात्रेच्या निमित्तानं अवघा जोतिबा डोंगर 'जोतिबाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषानं आणि गुलालाच्या उधळणीनं न्हाऊन निघाला. राज्यासह देशभरातील लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या वाडी रत्नागिरी इथल्या चैत्र यात्रेचा मुख्य सोहळा अत्यंत उत्साहात सुरू झाला. या मंगलप्रसंगी राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते मानाच्या सासनकाठ्यांचं विधीवत पूजन करण्यात आलं.

**पाऊस-लातूर**

लातूर जिल्ह्यात काल सायंकाळी अचानक हवामानात बदल झाला. त्यानंतर वादळी वाऱ्यासह रेणापूर तालुक्यातील काही भागात मुसळधार पाऊस आणि गारपीट झाली. यामुळे गरसुळी, पळशी आणि तत्तापूर शिवारातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

**हवामान**

राज्यातल्या चारही विभागात तुरळक ठिकाणी वीजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह गारांचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.